# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२ ०६०१, २२६९ ०६०२, २२६४ ११५०/५१, फॅक्स - २२६९ २१०२.
तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in


अधिसूचना

क्रमांक:२अ/एडीएम/२००९/प्रमाणपत्रे/ ४७७
दिनांक : 17 MAR 2009

**विषय : शैक्षणिक वर्ष २००९-१० मधील व्यावसायिक पदवी तसेच पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या राखीव जागांवर प्रवेश घेण्यासाठी आवश्यक असलेली प्रमाणपत्रे प्राप्त करुन घेण्याबाबत**

व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या राखीव जागांवर प्रवेश घेणाऱ्या पात्र मागासवर्गीय उमेदवारांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचा प्रवेश अर्ज सादर करतेवेळी शासन नियमानुसार विहित नमुन्यातील प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २००९-२०१० मध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी तसेच एमबीए/एमएमएस, एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांस प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व मागासवर्गीय उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी खालीलप्रमाणे संबंधित अभ्यासक्रमासाठी आवश्यक प्रमाणपत्रे प्राप्त करुन घ्यावीत. संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश अर्जाच्या स्वीकृतीच्यावेळी जर आवश्यक प्रमाणपत्रे संबंधित उमेदवार सादर करु शकला नाही, तर त्यास संबंधित प्रवर्गाच्या आरक्षणाचा फायदा मिळणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील, याची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | मागासवर्गीय प्रवर्ग | आवश्यक असलेली मूळ प्रमाणपत्रे | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | **जात प्रमाणपत्र** | **जात वैधता प्रमाणपत्र** | **नॉन-क्रिमी लेअर प्रमाणपत्र** |
| १ | अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र ,वास्तुशास्त्र आणि हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी **पदवी** तसेच एमबीए / एमएमएस, एमसीए **पदव्युत्तर पदवी** | **SC, ST** | **आवश्यक** | **आवश्यक** | लागू नाही |
| | | **VJDT/NT(A), NT(B), NT(C), NT(D), OBC, SBC** | **आवश्यक** | **आवश्यक** | **आवश्यक** |

D:\Rajesh\Admission 09-10\notification for certificate.doc

- जात प्रमाणपत्र (Caste Certificate) : महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी सदर जात महाराष्ट्र शासनाच्या मागासवर्गीयांच्या अधिकृत यादीमध्ये मोडत असल्याचे संबंधित विद्यार्थ्यांच्या नावे दिलेले जात प्रमाणपत्र आवश्यक आहे. तथापि सदर प्रमाणपत्रामध्ये मायग्रेशन, अथवा जात महाराष्ट्राबाहेरील राज्यातील आहे असे नमूद केलेली जात प्रमाणपत्र मागासवर्गीय उमेदवार म्हणून प्रवेशासाठी ग्राहय धरली जाणार नाहीत . अशी प्रमाणपत्रे सादर करून प्रवेश घेतल्यास कोणत्याही टप्प्यावर सदर उमेदवाराचा प्रवेश रद्द करण्यात येईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील या बाबीची नोंद घ्यावी.

- जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) : महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी संबंधित विद्यार्थ्यांच्या नावे दिलेले जात वैधता प्रमाणपत्र.

- नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र : महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.सीबीसी १०/२००६/प्र.क्र.१५/मावक५, दि.०५/०६/२००६ अन्वये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व्यतिरिक्त VJ/DT(A)/NT(B)/NT(C) /NT(D)/OBC/SBC या सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना प्रगत व उन्नत गटाचे (नॉन क्रिमी लेअरचे) तत्व लागू केलेले आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या संबंधित प्राधिकाऱ्यांनी दिलेले दि. ३१/०३/२०१० पर्यंत वैधता असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate)

उपरोक्त आवश्यक ती प्रमाणपत्रे उमेदवार/पालकांनी दि.१० जून २००९ पर्यन्त तयार ठेवावीत. सदर प्रमाणपत्रापैकी जर एखादे प्रमाणपत्र नसेल तर संबंधित उमेदवार त्याबाबतच्या सवलतीस पात्र ठरणार नाही, याची नोंद घ्यावी.

तसेच शैक्षणिक वर्ष २००९-१० मध्ये व्यावसायिक पदव्युत्तर पदवी व पदवी अभ्यासक्रमांस प्रवेश घेणाऱ्या सर्व उमेदवारांना भारतीय नागरीकत्वाचे प्रमाणपत्र (Indian Nationality Certificate) सादर करणे बंधनकारक आहे.

कॅटगरी बी मध्ये अर्ज करणारे जे उमेदवार इयत्ता १० वी व / किंवा १२वी महाराष्ट्र राज्याबाहेरून भारतातून कोणत्याही राज्यातून उत्तीर्ण झालेले उमेदवार तसेच डिफेन्स कॅटेगिरीसाठी अर्ज करणा-या उमेदवारांना महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र आवश्यक आहे. सदरचे अधिवास प्रमाणपत्र हे By Birth/ Permanent Resident असे असणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्रात स्विकारलेले वास्तव्य (ॲक्सेप्टेड), बाय चॉईस, किंवा फॉर एज्युकेशन पर्पज असे नमूद केलेले डोमिसाईल्ड प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार नाही या बाबीची विशेषत्वाने नोंद घ्यावी.

प्रवेशाबाबतची इतर सर्व माहिती या संचालनालयाच्या **www.dte.org.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(डॉ. सु. का. महाजन)
प्र.संचालक,तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

D:\Rajesh\Admission 09-10\notification for certificate.doc